**महाराष्ट्र शासन**

क्र. टिपीबी-४३१७/२५५/प्र.क्र.५९/२०१७/नवि-११
नगर विकास विभाग, ४ था मजला
मंत्रालय, मुंबई -३२.
दिनांक :- ०६/११/२०१७.

प्रति,
आयुक्त,
बृहन्मुंबई महानगरपालिका.

विषय :- Ulilisation of TDR with respect to clarification issued by UDD.U/No. TPB-4317/255/C.R.59/2017/UD-11 Dt. 07/07/2017.

संदर्भ :- आपले क्र. एमसीपी/६८५, दि. १६/०९/२०१७ रोजीचे पत्र.

महोदय,

आपणाकडील संदर्भित पत्रान्वये हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) वापर अनुज्ञेय करण्यासंदर्भात विनियम ६२(३) अन्वये स्पष्टीकरण अपेक्षिले आहे.

शासन नगर विकास विभागाकडील दि. १६/११/२०१६ रोजीच्या अधिसूचनेनुसार विनियमातील खंड क्र. ५.० मध्ये हस्तांतरणीय विकास हक्क (TDR) वापरण्यासंदर्भात तरतूद केलेली आहे. खंड क्र. ५.४ मध्ये TDR वापर आणि रस्ता रुंदी यांची सांगड घालण्यात आलेली आहे.

संदर्भित पत्राचे अनुषंगाने विनियम ६२(३) अन्वये खालील स्पष्टीकरण कळविण्याच्या मला सूचना आहेत :-

"मुळ FSI देण्यासाठी जो रस्ता महानगरपालिका ग्राहय धरते तो रस्ता त्याच्या रुंदीप्रमाणे TDR साठी खालील अटीसापेक्ष अनुज्ञेय राहील.

<u>अटी :-</u>

i) सदर रस्ता अभिन्यास रस्ता (Layout road) असल्यास अभिन्यास (Layout ) ला महापालिकेची मान्यता असावी.

ii) खाजगी रस्ता असल्यास दस्त नोंदणीकृत व महानगरपालिकेच्या अभिलेख (Record ) वर असावा.

iii) महानगरपालिकेच्या परवानगीशिवाय अशा रस्त्याची रुंदी कमी करणे अनुज्ञेय नसावे व महानगरपालिका अशी परवानगी देणार नाही असे धोरण ठरवावे."

आपला,

( श्रीरंग लांडगे )
सह सचिव तथा संचालक, नगर रचना
महाराष्ट्र शासन

D:\CAMP UD-11\UD-11\LETTER\KIRAN\LETTER.Doc